Shri Narayanrao Babasaheb Education Society's
SHRI VENKATESH MAHAVIDYALAYA, ICHALKARANJI
ISO 9001 : 2015 Certified

सत्क्रिया आचरावी
Estd. 1983

# VENKATESH BULLETIN

• प्रेरणा : श्री ना. बा. एज्यु. सोसायटी, इचलकरंजी • प्रेसिडेंट : श्री. श्रीनिवासजी बोहरा • ऑ.सेक्रेटरी : श्री. बाबासाहेब वडींगे •

• संपादक : प्राचार्य डॉ. विजय ए. माने • कार्यकारी संपादक : डॉ. सौ. सारिका आर. ठाकर • सहसंपादक : प्रा. महेश पी. केसरकर • वर्ष पहिले, अंक दुसरा : फेब्रुवारी २०२२ ते जून २०२२ •

कार्यालयीन संपर्क : ☎ 0230 - 2424534, 240380 mshrivenkatesh@yahoo.com www.venkateshcollege.com

## अधिष्ठाता पदी निवड झाल्याबद्दल प्रोफेसर (डॉ.) श्रीकृष्ण महाजन यांचा सत्कार



**कॉमर्स विभागाचे अधिष्ठाता प्रोफेसर (डॉ.) श्रीकृष्ण महाजन यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने**

श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी यांच्यामार्फत प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी अधिष्ठाता पदी निवड झाल्याबद्दल प्रोफेसर (डॉ.) श्रीकृष्ण महाजन यांचा सत्कार केला. एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती असून इचलकरंजीचे सुपुत्र व श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून त्यांचा महाविद्यालयाशी सलोख्याचा संबंध आहे. १९९५ ते २००५ या काळात कॉमर्स कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केल्यानंतर २००५ पासून ते शिवाजी विद्यापीठात कार्यरत आहेत. गेली २८ वर्षे ते शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करत आहेत.

४६ शोध निबंध संशोधन पत्रिकेत प्रकाशित झाले असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधून त्यांनी ६८ शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १५ विद्यार्थ्यांनी पी.एच.डी. तर तेरा विद्यार्थ्यांनी एम.फिल. पूर्ण केली आहे. विद्यापीठाच्या प्रभारी अधिष्ठाता पदासह त्यांनी विद्या परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, आणि अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून ही कार्य केले आहे. शिवाजी विद्यापीठाने ही त्यांना उत्कृष्ट शिक्षक व संशोधक पुरस्काराने गौरविले आहे.

अशा अभ्यासू व्यक्तिमत्त्वाकडे शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स विभागाची कमान विद्यापीठ कुलगुरू डॉ. डी. एन. शिर्के यांनी अधिष्ठातापदी नेमणूक करून सोपवली आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी त्यांचा सत्कार केला व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लोकशाही सुदृढतेसाठी भावी पिढी जागरूक असणे आवश्यक – प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील




**वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभामध्ये मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील**

''विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाने हुरळून न जाता भावी आयुष्यातील स्पर्धात्मक युगामध्ये टिकण्यासाठी सतत संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. याचबरोबर विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्याचे भान ठेवत लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मतदानासारखा अमूल्य हक्क वेळोवेळी बजावला पाहिजे यातून आपण आपले कर्तव्य बजावतो व आपल्या देशातील लोकशाही सुदृढ बनवण्यासाठी सहकार्य करत असतो.'' असे मत प्राचार्य डॉ. व्ही एम. पाटील यांनी मांडले ते श्री व्यंकटेश महाविद्यालयात आयोजित पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभामध्ये बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर यांनी करून दिला. महाविद्यालयाचा वार्षिक लेखा जोखा प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी मांडला यावेळी ते म्हणाले, ''विद्यापीठामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत येण्याबरोबर खेळ आणि सांस्कृतिक क्षेत्रात देखील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात यश मिळवून महाविद्यालयाचे नाव यशोशिखरावर पोहोचले आहे. त्यामुळे पंचक्रोशीमध्ये महाविद्यालयाचे नाव गुणवंत विद्यार्थ्यांची खाण म्हणून ओळखले जाते.'' या कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. श्रीनिवासजी बोहरा यांनी मांडले. संस्था सचिव श्री.बाबासाहेब वडिंगे यांनी कै मदनलालजी बोहरा यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार संस्थेची वाटचाल सुरू असल्याचे सांगितले. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, कला, खेळ, विविध स्पर्धा यामध्ये मिळवलेल्या यशाबद्दल त्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला कार्यक्रमाचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालक श्री. आमीन बाणदार यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. एस. एन. जरंडीकर व कुमारी मोहिनी आंचलिया यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. बी. एन. कांबळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विविध समित्या द्वारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## श्री व्यंकटेश महाविद्यालयांमध्ये ग्रंथ प्रदर्शन संपन्न



**ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करताना संस्था प्रेसिडेंट श्री. श्रीनिवासजी बोहरा व प्राचार्य डॉ. व्ही.ए.माने**

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये ग्रंथालय विभागामार्फत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन ना.बा. एज्युकेशन सोसायटीचे प्रेसिडेंट मा. श्रीनिवासजी बोहरा यांच्या हस्ते पार पडले. भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून ग्रंथप्रदर्शनात सुरुवात झाली.

उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने, उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर, ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर व महाविद्यालयातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. बेस्ट बुक सेलर्स, कोल्हापूर यांच्यामार्फत या बुक प्रदर्शनांमध्ये दिल्ली, आग्रा, कानपूर तसेच भारतातील अनेक नामवंत प्रकाशकांची पुस्तके ठेवण्यात आली होती. महाविद्यालयातील शिक्षक स्टाफ व विद्यार्थी यांनी त्यांना आवश्यक अशा २८० पुस्तकांची निवड या ग्रंथ प्रदर्शनामध्ये केली. हे ग्रंथप्रदर्शन यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक – शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## श्री व्यंकटेश महाविद्यालयाचा शैक्षणिक सहयोग करार



**शैक्षणिक सहयोग करारावेळी उपस्थित प्राचार्या डॉ. वाय. व्ही जुगळे व सौ. एस. टी. बिरंजे**

श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी व श्री आण्णासाहेब डांगे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, हातकणंगले यांच्यामध्ये शैक्षणिक सहयोग करार करण्यात आला. या अंतर्गत दोन्ही महाविद्यालयामध्ये पुढील तीन शैक्षणिक वर्षात संशोधन सुविधाची देवाणघेवाण, विषयातील कौशल्य, फॅकल्टी एक्सचेंज, शिक्षण संसाधने, आंतर ग्रंथालय योजना, परिषद, सेमिनार किंवा कार्यशाळा यासारख्या संयुक्त शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन इ. उपक्रम एकत्रित राबवले जाणार आहेत. या अंतर्गत व्यंकटेश महाविद्यालयातील अकौटन्सी विषयाच्या प्राध्यापिका सौ. एस. टी. बिरंजे यांनी व्यंकटेश महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून डांगे कॉलेजच्या प्राचार्या, सौ. डॉ. वाय. व्ही. जुगळे यांना करार पत्र दिले. फॅकल्टी एक्सचेंज अंतर्गत प्रा. एस. टी. बिरंजे यांनी आण्णासाहेब डांगे आर्ट्स, सायन्स कॉमर्स महाविद्यालयातील बी. कॉम. भाग ३ मधील विद्यार्थ्यांना सेमिस्टर ६ साठीच्या अकौटन्सी पेपर ३ या विषयातील फायनान्शीयल स्टेटमेंट या टॉपिकवर मार्गदर्शन केले. यावेळी डांगे कॉलेजचे अकौटन्सी प्रमुख डॉ. अशोक जाधव, डॉ. वंदना तांदळे, डॉ. विजय डोंगरे आदी उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार




**सत्कार समारंभावेळी उपस्थित विद्यार्थी व मान्यवर**

श्री व्यंकटेश महाविद्यालयातील बारा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त झाली. महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

बी.कॉम. अभ्यासक्रमांमध्ये प्रणील अनिल रावळ यास पाच हजार रुपये शिष्यवृत्ती प्राप्त झाली. रुचिता सुनील गडक, संस्कृती रवींद्र पाटील , नेहा सुनील कारंडे, ऋतुजा सुनील खुडे, समरीन मानकर, श्रावण मनोज लाड, रोहित सुरेशचंद्र अंचलिया, दिव्या अरुण सोनटक्के तर एम. कॉम. अभ्यासक्रमामध्ये वृद्धी संतोष शहा, रामेश्वरी सुधाकर कोल्हापुरे व स्नेहल गजानन जगदाळे यांना प्रत्येकी दहा हजार रुपये गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त झाली. एकूण १,१५,००० रुपये शिष्यवृत्ती प्राप्त झाली. याबद्दल महाविद्यालयामध्ये सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी ना.बा. एज्युकेशन सोसायटीचे प्रेसिडेंट श्रीनिवास बोहरा, सेक्रेटरी बाबासाहेब वडिंगे व विश्वस्त एस.बी.चंगेडिया उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, ''महाविद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत हे यश संपादन केले आहे. भावी आयुष्यामध्ये या विद्यार्थ्यांचे उज्वल करिअर असून यापेक्षाही अधिक यश त्यांनी संपादन करावे.''

याप्रसंगी शिष्यवृत्ती विभागाचे कामकाज पाहणारे कार्यालयीन कर्मचारी श्री. महेश चौगुले यांचेही अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नवकल्पनेतूनच नाविन्यपूर्ण उद्योग निर्माण होतो - प्रोफे. डॉ. ए. एम. गुरव



**लक्षवेध सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रोफेसर (डॉ.) ए. एम. गुरव**

''भारताची भावी पिढी ही तरुण पिढी असून त्यांच्या नवकल्पनेतूनच नाविन्यपूर्ण उद्योग निर्माण होतो व नवीन उद्योजक तयार होत असतो. तरुण पिढीने निर्माण होणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास त्यातून सर्जनशीलतेला वाव मिळतो आणि नवीन कल्पना सत्यात उतरत असतात. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीस महाविद्यालयीन स्तरावर वाव देण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत.'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे प्रमुख प्रोफेसर (डॉ.) ए. एम. गुरव यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फोर इनोव्हेशन, इक्युबेशन अँड लिंकेजेस अंतर्गत लक्ष्यवेध सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, ''विद्यार्थ्यांच्या कौशल्य व्यवसायाभिमुखता व सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी 'लक्ष्यवेध' या सेंटरची स्थापना करण्यात आली असून या मार्फत महाविद्यालयात व्यवसाय कौशल्य विकसित करणारे कार्यक्रम व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण यांचे आयोजन करण्यात येणार आहे.'' प्रमुख पाहुण्यांची ओळख आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.एच. आंबवडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी मानले. सुत्रसंचलन कुमारी मोहिनी आंचलिया हिने केले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर व लक्षवेध सेंटरचे सदस्य तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादक मंडळ
संपादक: प्राचार्य डॉ. विजय ए. माने | कार्यकारी संपादक: डॉ. सौ. सारिका आर. ठाकर | सहसंपादक: प्रा. महेश पी. केसरकर | सदस्य: प्रा. अमीन आय. बाणदार | सदस्य: प्रा. शरणाप्पा बी. मलघाण | सदस्य: प्रा. सौ. शुभांगी टी. बिरंजे | सदस्य: प्रा. आनंदा बी. विभूते

# VENKATESH BULLETIN





## संपादकीय मनोगत

महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षातील 'व्यंकटेश बुलेटिन' चा दुसरा अंक प्रकाशित करीत असतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयामध्ये या सत्रात कृषी अर्थशास्त्र' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. तसेच या सत्रात महाविद्यालयाने इनोव्हेशन व इंक्युवेशन सेंटरची स्थापना करण्यात आली. आण्णासाहेब डांगे महाविद्यालय व रविंद्रनाथ टागोर वाचनालय यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आला.

महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५, बँकांचे लेखापरिक्षण, आय.टी. क्षेत्रात करिअर संधी, संशोधन पद्धती, डिजीटल मार्केटिंग, माहिती अधिकार कायदा अशा वेगवेगळ्या विषयांवरती कार्यशाळा व व्याख्यान संपन्न झाले.

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. अतुल कानिटकर यांची बँक ऑफ महाराष्ट्राच्या कायदा अधिकारपदी निवड झाली व श्री. श्रावण जाधव याची पोलिस निरिक्षक पदी निवड झाली. तसेच या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठामार्फत १२ विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त झाली. हे उदंड यश अखंडित ठेवूया आणि उज्वल भविष्याचा संकल्प करूया. सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

– प्राचार्य डॉ. विजय ए. माने

## हार्दिक अभिनंदन

### श्री व्यंकटेश महाविद्यालयातील सी.ए. फायनल परीक्षेमध्ये यश प्राप्त केलेले विद्यार्थी



सी.ए.
प्रियांका रमेशचंद संचेती



सी.ए.
पायल शिवप्रसाद दारक



सी.ए.
नम्रता विजयकुमार विधानी



सी.ए.
श्रुती घन:श्याम सोनी



सी.ए.
पारस सुनिल शहा



सी.ए.
पंकज सुरेश खोत



सी.ए.
यशवंत बसवराज कोपरकर



सी.ए.
गजेंद्र पन्नालाल तिवारी



सी.ए.
गौरव शंकरलाल धूत

## भावपूर्ण श्रध्दांजली



**स्व. हरिष श्रीनिवासजी बोहरा**

चेअरमन, श्री. ना.बा. एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी
स्वर्गवास २५ जून, २०२२

## रवींद्रनाथ टागोर वाचनालय व श्री व्यंकटेश महाविद्यालयांमध्ये सामंजस्य करार



सामंजस्य कराराप्रसंगी ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर व ग्रंथपाल बेबी फरीद नदाफ

इचलकरंजी नगरपरिषदेच्या रवींद्रनाथ टागोर वाचनालय व श्री व्यंकटेश महाविद्यालय यांच्यामध्ये विविध बाबीवर सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी श्री व्यंकटेश महाविद्यालयाकडून प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने व रवींद्रनाथ टागोर वाचनालयाचे ग्रंथपाल बेबी फरीद नदाफ यांनी या करारावर स्वाक्षरी केली. श्री व्यंकटेश महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध असणारे ग्रंथसंपदा व रवींद्रनाथ टागोर वाचनालयातील ग्रंथसंपदा याचा वापर दोन्ही वाचकांना व्हावा हा मुख्य हेतू या सामंजस्य कराराचा आहे असे सांगण्यात आले. हा करार २०२२ ते २०२७ असा पाच वर्षाचा आहे.

दोन्ही ग्रंथालयामार्फत ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी याचे देखील आयोजन करण्याचे ठरविण्यात आले आहे. ''रवींद्रनाथ टागोर वाचनालयातील दुर्मिळ ग्रंथसंपदा श्री वेंकटेश महाविद्यालयाच्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी निश्चितच उपयोगी पडेल. असे मत या प्रसंगी ग्रंथपाल बेबी फरीद नदाफ यांनी व्यक्त केले. ''ग्रंथसंपदा ही फक्त पाहण्यासाठी अथवा सजावटीसाठी नसून त्या ग्रंथसंपदेस वाचक वर्ग मिळाला पाहिजे. यासाठी ग्रंथपालांनी सदैव तयार असले पाहिजे. रवींद्रनाथ टागोर वाचनालयातील समृद्ध ग्रंथसंपदा विद्यार्थ्यांच्या उपयोगी असून त्या ग्रंथसंपदेतून विद्यार्थ्यांनी ज्ञानप्राप्ती करावी या विचाराने हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. असे प्रतिपादन व्यंकटेश महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर यांनी केले.

## स्त्रियांवरील अत्याचार ही समाजाला लागलेली कीड – ॲड.ए. बी. खांडेकर



व्याख्यान देताना ॲड. ए. बी. खांडेकर

''भारत हा पुरुष प्रधान संस्कृतीचा देश असल्याने अनेक वेळा स्त्री अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आलेल्या आपणास दिसून येतात. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार ही समाजाला लागलेली कीड आहे. म्हणून शासनाने २००५ साली कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधित कायद्याची स्थापना केली. पण भारतीय जनतेमध्ये अजून देखील या कायद्याची जागरुकता झालेली नाही हे दिसून येते. म्हणून महाविद्यालयीन स्तरावर अशा व्याख्यानाचे आयोजन करणे गरजेचे आहे.'' असे प्रतिपादन ॲडव्होकेट ए. बी. खांडेकर यांनी केले.

श्री व्यंकटेश महाविद्यालयात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ या वर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानांमध्ये ते बोलत होते. प्रथम सत्राचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. एन. एच. आंबवडे यांनी करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने हे होते. द्वितीय सत्रामध्ये ॲडव्होकेट सौ ए. ए. खांडेकर यांनी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ महिलांविषयक जागरुकता या विषयावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व पालक यांना आमंत्रित करण्यात आले होते. द्वितीय सत्राचे अध्यक्षपदी उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर हे होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी मानले. महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षामार्फत या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

## श्री व्यंकटेश महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क विषयावर कार्यशाळा संपन्न'



बौध्दिक संपदा हक्क विषयावर मार्गदर्शन करताना श्री. सागर पोळ

राष्ट्रीय बौद्धिक संपदा जागृती अभियान, दिल्ली व बौद्धिक संपदा हक्क कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा हक्क या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी व्याख्याते म्हणून पेटंट ऑफिस, मुंबई येथील पेटंट आणि डिझाइन विभागाचे सहाय्यक नियंत्रक श्री. सागर बाबुराव पोळ यांना निमंत्रित करण्यात आली होते. व्याख्यानाप्रसंगी बोलताना ते म्हणाले, ''भारत शासनाने भारतीय नागरिकांमध्ये बौद्धिक संपदा हक्काविषयी जागरूकता निर्माण होण्यासाठी निपम म्हणजेच राष्ट्रीय बौद्धिक संपदा जागरुकता अभियानाची सुरुवात केली. यातून बौद्धिक संपदा हक्काविषयी जागरुकता निर्माण करण्याचे कार्य सुरू आहे.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, ''भारताची भावी पिढी वर्गावर्गात शिकत असून त्यांच्यापर्यंत बौद्धिक संपदा हक्क पोहोचवण्यासाठी 'निपम' व शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क कक्षामार्फत शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. यातूनच या कार्यक्रमाचे आयोजन आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदा हक्काची जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून करण्यात आल्याचे ते म्हणाले.'' कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख आय. क्यू. ए. सी. विभागाच्या को-ऑर्डिनेटर डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी करून दिली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केली. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर, डॉ. एस. एच. आंबवडे, ग्रंथपाल एम.पी. केसरकर, डॉ. पी. आर. गायकवाड तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कुमारी मोहिनी आंचलिया हिने केले. आभार प्रदर्शन डॉ. एस. आर. ठाकर यांनी मांडले.

## राष्ट्र सेवेची बीजे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये रोवली जातात – श्री. बाबासाहेब वडिंगे



शिबिर समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव श्री. बाबासाहेब वडिंगे

''भारतीय भावी पिढीमध्ये राष्ट्र सेवेची बीजे रोवण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये केले जाते. प्रत्येक भारतीय नागरिकाने राष्ट्राची सेवा करणे हे आपले कर्तव्य मानले पाहिजे. तरुण पिढी जेव्हा महाविद्यालय स्तरावर अशा शिबिरांमधून विविध प्रकारचे सामाजिक कार्य करत असतात तेव्हा आपोआपच त्यांच्यामध्ये राष्ट्रासाठी काहीतरी करण्यासाठी ची उमेद जागृत होत असते.'' असे प्रतिपादन श्री. बाबासाहेब वडींगे यांनी केले. ते टाकळी येथे श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते.

सात दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये गावातील परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, मराठी विद्या मंदिर परिसर तसेच स्मशाभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्याच बरोबर या शिबिरामध्ये माझी वसुंधरा, साक्षरता अभियान, स्वच्छ भारत, आजादी का अमृत महोत्सव तसेच मतदान जनजागृती साठी पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. तसेच नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या समारोप समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने हे होते. अध्यक्ष भाषणात ते म्हणाले, ''आपल्या स्वयंसेवकांनी अतिशय कष्टाने गेले सात दिवस कार्य केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कोठेही कमी पडणार नाहीत याबाबत मला खात्री वाटते.'' विशेष श्रमसंस्कार शिबिर यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. अमीन बाणदार, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक कांबळे, श्री. अजय दळवी श्री. पपीन चौधरी यांनी काम पाहिले. तर टाकवडे गावचे लोकनियुक्त सरपंच श्री. पी. वाय. पाटील, उपसरपंच सौ. जयश्री निर्मळ, ग्रामविस्तार अधिकारी श्रीमती एस. एम. शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने, उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर, कार्यालयीन अधिक्षक श्री. अनोष गायकवाड या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

## लेखापरीक्षण करताना बँकेची प्रगती हा उद्देश असायला हवा – अनंत पुजारी



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सन्मती बँकेचे ऑडिटर श्री. अनंत पुजारी

''लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण करताना केवळ होणाऱ्या चुका शोधणे एवढेच काम नाही, तर सहकारी बँकेची प्रगती करायची हा महत्त्वाचा उद्देश असायला हवा. कर्जे व ठेवी यांचा समन्वय तसेच बँकेने दिलेली कर्जे याची काटेकोर तपासणी करणे गरजेचे असते.'' असे मत सन्मती बँकेचे ऑडिटर अनंत पुजारी यांनी व्यक्त केले. श्री व्यंकटेश महाविद्यालय व सन्मती सहकारी बँकेच्या झालेल्या सामंजस्य करारानुसार व्यंकटेश महाविद्यालयात बँकांचे लेखापरीक्षण या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय माने होते. ऑडिटर पुजारी म्हणाले, सहकारी बँका, खाजगी बँका,सरकारी बँका यांना लेखापरीक्षण हे रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सक्तीचे आहे.

बँकेने दिलेली कर्जे ही योग्य कामासाठी दिली आहेत का याची तपासणी आवश्यक आहे. तसेच या कर्जावरील व्याज योग्य वेळी दिलेल्या मुदतीत भरले आहे, याची तपासणी होणे गरजेची असते. लेखा परीक्षकाने बँका, सहकारी संस्थांचे अंतर्गत नियंत्रण पद्धती यामध्ये येणाऱ्या अडचणी तसेच लेखापरीक्षणाची पद्धत, संचालक मंडळाचा बँकेवर असणारे नियंत्रण या सर्व घटकांवर लक्ष ठेऊन माहिती जबाबदारी आहे.'' प्रा. डी. एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मोहिनी आंचलीया यांनी सुत्रसंचलन केले. पी. आर. गायकवाड यांनी आभार मानले.

## आय.टी. क्षेत्रातील आधुनिक प्रवाह या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



आय.टी. क्षेत्रातील आधुनिक प्रवाह या विषयावर व्याख्यान देताना डॉ. जयदीप पाटील

श्री वेंकटेश महाविद्यालयामध्ये बी.कॉम. आय.टी. विभागामार्फत ''आय.टी. क्षेत्रातील आधुनिक प्रवाह'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून डी. वाय. पाटील एग्रीकल्चर अँड टेक्निकल विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. जयदीप पाटील हे होते. व्याख्यानात बोलताना ते म्हणाले, ''सध्या आय.टी. सेक्टर मध्ये नवीन सोळा ट्रेंड असून प्रत्येक ट्रेडमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. भविष्यामध्ये करिअर करण्यासाठी आय.टी. क्षेत्राचा विद्यार्थ्यांनी जरूर विचार करावा. बी. कॉम. आय.टी. कोर्स बरोबर त्या संबंधित इतर कोर्स देखील विद्यार्थ्यांनी केल्यास इतर क्षेत्राच्या तुलनेत या क्षेत्रामध्ये चांगले पगार मिळतात.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. व्ही.ए.माने म्हणाले, ''आय.टी. क्षेत्रातील मोठ्या संधी पाहून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी या कोर्सची सुरुवात महाविद्यालयात करण्यात आली आहे. भविष्यामध्ये आय. टी. एम. कॉम. सुरुवात करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कुमारी स्नेहा होगाडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. प्रदीप गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमासाठी आय.टी. बी.कॉम. विभागाचे सर्व विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## जाहिरात एक माध्यम नाही तर समाजाचे प्रतिबिंब – श्री. उदय गोडबोले



जाहिरातीच्या जगात या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री. उदय गोडबोले

''औद्योगिक क्षेत्रांमध्ये जाहिरातीच खूप मोठे स्थान असून उत्पादन झालेल्या प्रत्येक मालास ग्राहक मिळवण्यासाठी तसेच आपले उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जाहिरात ही माध्यमाचे कार्य करत असते. जाहिरात बनवताना ग्राहक कोण आहे, जाहिरात कोणासाठी, कोणते माध्यम वापरायचे याचा विचार करावा लागतो.'' असे प्रतिपादन आर. आय. टी., इस्लामपूर येथील रेडिओ शुगरचे स्टेशन मॅनेजर श्री. उदय गोडबोले यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'जाहिरातीच्या जगात' या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. प्रथम सत्रात त्यांनी सामाजिक व व्यावहारिक जाहिराती बनवणे या विषयावर आपले व्याख्यान दिले. त्यांनी जाहिरात बनवताना घ्यावयाची काळजी, माध्यमाची निवड, जाहिरातीचा होणारा परिणाम अशा विविधांगांनी जाहिराती बाबत विश्लेषण केले. कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये ''जाहिराती मधील कायदेशीर आणि नैतिक समस्या'' यावर प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर व डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी व्याख्यान दिले. याप्रसंगी बोलताना प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर म्हणाले. ''अनेक कंपन्यांमध्ये जाहिरात युद्ध आपणास पहावयास मिळते. पार्ले व ब्रिटानिया कंपनी मधील जाहिरात युद्ध आपण नेहमी पाहतो. एकमेकांच्या जाहिरातीमधील टॅगलाईन विरोधात दुसरी टॅगलाईन बनवलेल्या आपणास पाहावयास मिळतात. जाहिराती बनवताना मात्र कंपन्यांनी नैतिकता सांभाळणे गरजेचे असते.'' प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व अध्यक्षीय मनोगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. एस. आर. ठाकर यांनी करून दिली. प्रथम सत्राचे आभार डॉ. एस. एच. आंबवडे तर द्वितीय सत्राचे आभार डॉ. बी. एन. कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी मोहिनी आंचलीया हिने केले. कार्यक्रम योग्य रीतीने पार पाडण्यासाठी डॉ. डी. एस. कांबळे तसेच महाविद्यालयातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाविद्यालयात संशोधन कार्यपद्धतीवर कार्यशाळा संपन्न



संशोधन कार्यपध्दतीमधील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री. व्यंकटेश बडवे

श्री व्यंकटेश महाविद्यालयातील एम. कॉम. व बी.बी.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन कार्यपद्धतीवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते म्हणून डी. के. टी. ई. येथील एम.बी.ए .विभागाचे प्राध्यापक श्री. व्यंकटेश बडवे यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालय व डी. के. टी. ई. यांच्यामधील सामंजस्य करारांतर्गत त्यांना बोलवण्यात आले. त्यांनी यावेळी संशोधन संकल्पना व अर्थ तसेच परिकल्पना परीक्षण म्हणजे काय ते सांगून परिकल्पना परीक्षणाचे प्रकार, सूत्रे, व्याख्या याबाबत सखोल मार्गदर्शन केले. ते कॉमर्स असोसिएशन व बी.बी.ए. विभागामार्फत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, ''संशोधन हा विद्यार्थी दशेतील अविभाज्य घटक बनत चालला असून भारताला जगातील महासत्ता बनवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्राकडे करिअरच्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. कारण संशोधन क्षेत्रातील भारताचा वाटा अत्यल्प असून महाविद्यालयीन स्तरापासूनच विद्यार्थी संशोधनाकडे वळले तर निश्चित संशोधन क्षेत्रात भारत उंच भरारी घेईल म्हणून उच्च शिक्षणातील प्रत्येक महाविद्यालयाने अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा संशोधनाकडे कल वाढवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.'' या कार्यशाळेस महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर, बी.बी.ए. विभागाच्या समन्वयक श्रीमती पी.पी. दाईंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख श्रीमती पी.पी. दाईंगडे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सौ के.वी. जगनाडे यांनी मानले. कार्यशाळेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## महाविद्यालयात शाहू महाराज कृतज्ञता दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन



राजर्षी शाहू महाराज कृतज्ञता दिनानिमित्त अभिवादन करताना शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालीन विद्यार्थी–विद्यार्थिनी

''देशामध्ये जातीभेद नष्ट होऊन दिन – दलित समाजाला न्याय मिळावा म्हणून १९०२ साली कोल्हापूर संस्थानामध्ये आरक्षण लागू करून शाहू महाराजांनी आरक्षणाचा पाया घातला. शिक्षण प्रसार, अस्पृश्यता नष्ट करणे, आंतरजातीय विवाह मान्यता, पुनर्विवाह कायदा, राधानगरी धरण उभारणी, शाहू मिल यासारखी अनेक विधायक कार्य शाहू महाराजांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारे राजा म्हणून शाहू महाराजांनी आपली ओळख निर्माण केली.'' असे प्रतिपादन डॉ. आर. व्ही. सपकाळ यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये शाहू महाराज पुण्यतिथी दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने होते. त्यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची ओळख करून दिली. महाविद्यालयांमध्ये शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शाहू महाराज कृतज्ञता दिनानिमित्त सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या मैदानावर विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी १०० सेकंद स्तब्ध राहून अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागाच्यावतीने जनता बँक ते राजवाडा चौक या परिसरात स्वयंसेवकांनी १०० सेकंद स्तब्धता पाळण्यासाठी नागरिकांना आवाहन करून मार्गदर्शन केले. याचे नियोजन एन.एस.एस. विभाग प्रमुख श्री. अमीन बाणदार व डॉ. डी. एस. कांबळे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती. आभार डॉ.डी. एस. कांबळे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी–विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किरकोळ व्यापार व डिजिटल मार्केटिंग मध्ये करिअरच्या संधी – डॉ.एन.सी.माळी



किरकोळ व्यापार व डिजीटल मार्केटींग मधील करिअरच्या संधी विषयावर मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन.सी. माळी

''डिजिटल मार्केटिंग हे आधुनिक काळातील भविष्य असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अतिशय कमी कालावधीत डिजिटल मार्केटिंग चा प्रसार संपूर्ण जगात होताना दिसत आहे. डिजिटल मार्केटिंग व्यवसाय, प्रसार, ग्राहक आकर्षण करणारे योजना या विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध झाले असून विद्यार्थ्यांनी स्वतःचे करिअर घडविण्यासाठी याकडे एक संधी म्हणून पाहिले पाहिजे.'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाय.सी.एस.आर.डी. विभागातील प्राध्यापक डॉ. एन.सी. माळी यांनी काढले. श्री व्यंकटेश महाविद्यालय मध्ये अग्रणी योजने अंतर्गत आयोजित ''किरकोळ व्यापार व डिजिटल मार्केटिंग मधील करिअरच्या संधी'' या कार्यशाळेतील प्रथम सत्रामध्ये ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व अध्यक्षीय भाषण त्यांनी केले. कार्यशाळेची प्रस्तावना व प्रमुख पाहुण्यांची ओळख उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर यांनी करून दिली. दितीय सत्रामध्ये संजय घोडावत विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिष्ठाता डॉ. अबित सलाती म्हणाले, ''किरकोळ व्यापारामध्ये देखील रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध झाल्या असून सुपर मार्ट, डी मार्ट, एन मार्ट या सारख्या दुकानातून मोठ्या प्रमाणात विक्री केली जात असून ग्राहक देखील त्यास प्राधान्य देत असल्याचे आपणास दिसून येते.'' प्रथम सत्राचे आभारप्रदर्शन डॉ. एस.एच. आंबवडे तर द्वितीय सत्राचे आभारप्रदर्शन डॉ. बी. एन. कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्राध्यापिका कु. मोहिनी आंचलिया व कुमारी एस. ए. होगाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे विविध स्पर्धेत यश



विविध स्पर्धेतील यशाबद्दल बी.बी.ए. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. व्ही.ए.माने व शिक्षक स्टाफ

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यामार्फत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथील बी.बी.ए. विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध विभागात यश संपादन केले. या स्पर्धेसाठी इतर राज्यासह महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये'ॲडवर्टाइजमेंट प्रेझेंटेशन' या इव्हेंटमध्ये बी.बी.ए. विभागाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. या संघांमध्ये शफीक मुल्ला, सईद बेंडवाडे, पायल भाइसोरा, रिया तापडिया, विशाखा माळी, राधिका जोशी या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

'पोस्टर प्रेझेंटेशन' या स्पर्धेमध्ये प्रथम वर्षातील भावना जानमने व सृष्टी उळागड्डे या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. याबरोबर 'टीम बिल्डिंग' या स्पर्धा प्रकारांमध्ये द्वितीय वर्षातील सबिया शिरगावे, निकिता बेरा, हर्षदा पाटील, श्रेयांश पाटील व व्यंकटेश खारगे या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. याबद्दल महाविद्यालयात स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यामध्ये असेच यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उंच शिखरावर पोहोचवावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी बी.बी.ए. विभागाच्या को–ऑर्डिनेटर पी.पी. दाईंगडे, एस. एस. साळुंखे व सौ. के.व्ही. जगनाडे हे उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



व्याख्यान देताना डॉ. आर.जी. कोरबू

महाविद्यालयातील अर्थशास्त्र मंडळाच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार या विषयाचे व्याख्यान आयोजित केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर चे अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. आर. जी. कोरबू यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे अनेक पैलु विद्यार्थ्यांना दाखविले.

आंबेडकरांचा जातीव्यवस्थेवरील हल्ला हे केवळ उच्चवर्णीयांच्या वर्चस्ववादाला दिलेले आव्हान नव्हते, तर आर्थिक विकासाशी त्यांच्या मांडणींचा जवळचा संबंध होता. जाती व्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून, त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. कांबळे यांनीही डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक, आर्थिक योगदान यावर भाष्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्याची ओळख डॉ. एस. आर. ठाकर आभार डॉ. पी. आर. गायकवाड व सुत्रसंचालन कु. पुष्पा पाटील हिने केले. यावेळी विद्यार्थी–विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने यांना 'गुणवंत शिक्षक पुरस्कार' प्रदान



पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल महाविद्यालयाकडून सत्कार स्विकारताना

प्राचार्य डॉ. विजय माने यांना शिवजयंती गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल व्यंकटेश महाविद्यालयातर्फे त्यांचा सत्कार केला. शिक्षण क्षेत्रात शिक्षकांनी दिलेल्या योगदानासाठी मूल्यमापन करून दरवर्षी मराठा मंडळाकडून शिवजयंती गुणवंत शिक्षक पुरस्काराने शिक्षकांचा सन्मान केला जातो. यावर्षीचा गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांना दिला. प्राचार्य माने यांच्या विविध उपक्रमशीलतेमुळे व्यंकटेश महाविद्यालयास तीन वर्षे निमशहरी विभागात शिवाजी विद्यापीठाकडून प्रथम क्रमांक मिळाला आहे. महाविद्यालयास आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. ते शिवाजी विद्यापीठासह सोलापूर विद्यपीठातही अभ्यास मंडळात कार्यरत आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार केला. कार्यालय अधीक्षक अनोष गायकवाड, ग्रंथपाल एम. पी. केसरकर आदी उपस्थित होते.

VENKATESH BULLETIN



## व्यंकटेश महाविद्यालयाची समाज प्रबोधिनीस अभ्यास भेट



समाज प्रबोधिनी अभ्यास भेटीवेळी उपस्थित डॉ.डी.एस. कांबळे, ग्रंथपाल एम.पी. केसरकर व श्री. प्रसाद कुलकर्णी

श्री व्यंकटेश महाविद्यालय व समाज प्रबोधिनी यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार समाजप्रबोधिनीच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी श्री व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महाविद्यालयातील बी. कॉम. व एम. कॉम. मधील विद्यार्थ्यांसोबत डॉ. डी. एस. कांबळे व ग्रंथपाल श्री.एम.पी. केसरकर सहभागी झाले होते. प्रथम समाजप्रबोधिनीचे सेक्रेटरी श्री. प्रसाद कुलकर्णी यांनी सर्वांचे स्वागत करून समाजप्रबोधिनी संस्थेचा इतिहास व कार्याची ओळख करून दिली. यावेळी ते म्हणाले, ''समाज प्रबोधिनीमार्फत मोफत वर्तमानपत्र कक्ष, सुसज्ज ग्रंथालय, विविध प्रकारच्या व्याख्यानाचे आयोजन, समाज प्रबोधिनी मासिक अशी विविध कार्य करण्यात येतात.'' विद्यार्थ्यांनी ग्रंथालय, व्याख्यान कक्ष व संपूर्ण सुखसुविधा कक्षांना भेटी दिल्या व कर्मचाऱ्यांच्याकडून चालणारे संपूर्ण कामकाज समजून घेतले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना समाज प्रबोधिनी मासिके भेट देण्यात आली. प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त करून समाजप्रबोधिनी करत असलेल्या कार्याची कौतुक केले. डॉ. डी एस. कांबळे यांनी आभार मानले.

## श्री व्यंकटेश महाविद्यालयाचा विद्यार्थी अतुल कानिटकर याची कायदा अधिकारी म्हणून नियुक्ती




कायदा अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल अतुल कानिटकर यांच्या सत्कारप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने व शिक्षक-शिक्षकेत्तर स्टाफ

श्री व्यंकटेश महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी अतुल अनिल कानिटकर याची बँक ऑफ महाराष्ट्र कडून कायदा अधिकारी या पदी नियुक्ती झाली. याबाबत महाविद्यालयामध्ये त्याच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते व उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पुष्पगुच्छ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, ''वाढत्या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्राचे ज्ञान संपादन करून स्पर्धा परीक्षेला सामोरे गेल्यास यश निश्चित मिळते. संस्था व महाविद्यालयासाठी आपली नियुक्ती ही अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांना मिळणारे हे यश नेहमी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना प्रेरणा देत असते. महाविद्यालयाने गुणवंत विद्यार्थी निर्माण करण्याचा वारसा जपला असल्याचे त्यांनी सांगितले.'' श्री. अतुल अरुण कानिटकर यांनी मागील सात वर्षांपासून कायद्याचा अभ्यास केला असून सतत केलेले कष्ट आणि परिश्रमामुळेच हे यश प्राप्त झाल्याचे त्यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे अधीक्षक श्री. अनोष गायकवाड, डॉ. बा. ना. कांबळे, शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार, ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयावर व्याख्यान देताना बोट इन्स्टिट्यूट, इचलकरंजीचे प्रमुख श्री. प्रशांत कामरे

''बँकिंग क्षेत्रामध्ये इतर शाखेपेक्षा कॉमर्स शाखेचे विद्यार्थी अधिक प्रमाणात यशस्वी झालेले आपणास दिसून येतात त्यामुळे कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी पदवी पासूनच बँकिंग क्षेत्राची आपले करियर म्हणून निवड केल्यास ते निश्चित यशस्वी होतील.'' असे प्रतिपादन श्री. प्रशांत कामरे यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालयामार्फत आयोजित 'बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावरील व्याख्यानांमध्ये बोलत होते. बोट इन्स्टिट्यूट, इचलकरंजीचे प्रमुख म्हणून ते कार्यरत आहेत. महाविद्यालयातील एम. ओ. यु. कमिटी मार्फत या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने हे होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, ''स्पर्धा परीक्षेमध्ये प्रचंड स्पर्धा झाली असून विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपल्या करिअरची निवड केल्यास ते योग्य पद्धतीने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करू शकतात. विद्यार्थ्यांना दिशा देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमासाठी श्री. डी. एस. कांबळे, ग्रंथपाल श्री. एम. पी.केसरकर, प्रा. डी. एस. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. टी. एच. नायकवडी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महाविद्यालयात माहिती अधिकार कायद्यावर कार्यशाळा संपन्न



कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना ॲड. ए. बी. खांडेकर

''माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केल्यास समाजातील भ्रष्टाचारावा निश्चित आळा बसेल. अजूनही सामान्य जनतेत माहिती अधिकार जागृतीचे प्रमाण नगण्य असून, जनतेने माहिती अधिकाराचा चांगला अभ्यास करून समाजातील विविध प्रश्न मार्गी लागण्यासाठी समाजातील युवकांनी पुढे आले पाहिजे.'' असे प्रतिपादन ॲड. पंकज पाटील यांनी केले. महाविद्यालयामध्ये अग्रणी योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

प्रथम सत्रामध्ये ॲड. ए. बी. खांडेकर यांनी माहितीचा अधिकार कायदा २००५ चा इतिहास व त्याचे महत्व याबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. डी. एस. कांबळे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर यांनी केले. त्यामध्ये त्यांनी कार्यशाळेच्या स्वरूपाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. मोहिनी आंचलिया हिने केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए.माने हे होते. प्रथम सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. एस.एच. आंबवडे यांनी केले. द्वितीय सत्राचे आभार डॉ. बी. एन. कांबळे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी ग्रंथपाल एम.पी. केसरकर, डॉ. पी. आर. गायकवाड, सौ.एस.एस. कदम, कु. सबिया बाणदार, दहा महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## योगेश जाधव यांचा श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये सत्कार



पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल योगेश जाधव यांच्या सत्कार प्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही.ए. माने व शिक्षक-शिक्षकेत्तर स्टाफ

व्यंकटेश महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. योगेश श्रावण जाधव यांची एम.पी.एस.सी. मार्फत पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. याबद्दल श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सत्कार प्रसंगी बोलताना ते म्हणाले, ''चिकाटी व परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले असून भावी पिढीने स्पर्धा परीक्षांकडे एक करिअरची संधी म्हणून पाहिले पाहिजे.''

याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले,'' तरुण पिढीने व्यसनापासून दूर राहून आपले करियर घडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण व्यसनामुळे माणूस गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतो व आपले व आपल्या कुटुंबियांना उध्वस्त करत असतो.'' या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार डॉ. एस. एच. आंबवडे, अधीक्षक अनोष गायकवाड, कनिष्ठ लिपिक श्री. पपीन चौधरी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कृषी अर्थशास्त्र व कृषी उद्योग यावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार



वेबीनारमध्ये मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. बी. जुगळे

श्री. ना. बा. एज्युकेशन सोसायटीच्या श्री व्यंकटेश महाविद्यालयात अर्थशास्त्र मंडळाच्या वतीने शेती अर्थशास्त्र व शेती उद्योग या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. भारतातील कृषि आधारभुत अर्थव्यवस्था व शेती उद्योग यावर आधारित वेबिनरचे आयोजन करण्यात आले होते. सदर वेबिनार हा गुगल प्लॅटफॉर्म द्वारा आयोजित करण्यात आला होता. वेबिनारसाठी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य या वेबिनरचे समन्वयक आणि कॉमर्स विभाग प्रमुख प्रो. (डॉ.) एन. एम. मुजावर यांनी केले.

आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी सध्य स्थितीत शेतीचा बदलत जाणारा दृष्टिकोन व त्यासाठी आवश्यक ते बदल करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. ऑनलाईन माध्यमातून आयोजित सदर वेबिनार मधील प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रोफेसर व अर्थशाका विभाग प्रमुख डॉ. व्ही. बी. जुगळे यांनी मार्गदर्शन केले. शेती अर्थशास्त्र व त्याचे महत्त्व या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. वेबिनार च्या द्वितीय सत्रात डॉ. परशराम पाटील (शेती आणि नैसर्गिक संसाधन अर्थशास्त्रज्ञ, नवी दिल्ली) यांनी मार्गदर्शन केले. या वेबिनारचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. एम. एस. आंचलीया यांनी केले. या वेबिनरच्या सह समन्वयक, अर्थशास्त्र मंडळाच्या प्रमुख डॉ. एस. आर. ठाकर यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि वेबिनारचा समारोप झाला. सदर वेबिनार च्या यशस्वीतेसाठी डॉ. डी. एस. कांबळे, डॉ. पी. आर. गायकवाड, सौ. एस. एस. कदम व इतर प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

## व्यंकटेश महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार व बुलेटीन प्रकाशन



महाविद्यालयामध्ये व्यंकटेश बुलेटीनचे प्रकाशन करताना मान्यवर


श्री व्यंकटेश महाविद्यालयात व्यंकटेश बुलेटिनचे प्रकाशन करण्यात आले. ''व्यंकटेश बुलेटिन हा अनोखा व स्तुत्य उपक्रम आहे. बुलेटिनमधून महाविद्यालयातील विविध क्षेत्रांतील कामगिरीचे अवलोकन होते'' असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे विश्वस्त लक्ष्मीकांत पटेल यांनी व्यक्त केले. या वेळी विविध विभागांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्ता टिकवत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून यंदा बुलेटिनचे प्रकाशन करण्यात आले. यामुळे वर्षभरातील प्रत्येक उपक्रमाची वृत्तांत रुपात एकत्रित मांडणी झाली आहे. प्राचार्य डॉ.व्ही.ए. माने यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.सौ.एस.आर. ठाकर, एम. पी. केसरकर, सौ. एस. टी. बिरंजे, एस. व्ही. मलघान, ए. बी. विभुते यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये बी.बी.ए. विभागातील श्रुती पारिख ही शिवाजी विद्यापीठात बी.बी.ए. अंतिम परीक्षेत प्रथम आली. तिला शिवाजी विद्यापीठाचा श्री नेमिनाथदादा पाटील स्मृती पुरस्कार मिळाला. अमन कुट्टी याने राज्य अजिंक्यपद स्पर्धेत ज्युनिअर महाराष्ट्रश्री ७५ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच त्याला पाँडेचरी येथील ज्युनिअर भारतश्री स्पर्धेत पहिल्या सहामध्ये क्रमांक मिळाला. श्रेयांश पाटील याला शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कयाकिंग स्पर्धेत १००० मीटर व ५०० मीटरमध्ये प्रथम व २००मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला. अहमद मुजावर, श्रीकांत चंगेडिया, उपप्राचार्य प्रोफेसर (डॉ.) एन. एम. मुजावर, भालचंद्र ठिगळे, नितीन लड्डा, विजय दुधारकर, शेहनशाह मुजावर, मुकेश मालपाणी आदी उपस्थित होते.

## काळ्या ओढ्याने घेतला मोकळा श्वास



काळ्या ओढ्याची स्वच्छता करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी

श्री व्यंकटेश महाविद्यालयाने काळ्या ओढ्याची स्वच्छता केली. 'सकाळ'च्या 'पुन्हा साथ देऊया, चला पंचगंगा वाचवूया' या मोहिमेत सहभागी होत श्री व्यंकटेश महाविद्यालयाने आज आमराई रोडवरील काळ्या ओढ्याचा श्वास मोकळा केला. ओढ्यात साचलेला प्लास्टिक, जैविक कचरा असा सुमारे ११ टन कचरा संकलित केला. त्यामुळे ओढ्यातील पाण्याला वाट मोकळी झाली. तसेच, परिसराचे रूप पालटले. तीन तासांच्या मोहिमेत महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. स्वच्छतेला सुरुवात झाली. पुढील काळात पंचगंगेचे महत्त्व जपत पंचगंगेसह काळा ओढा संवर्धनाची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमिन बाणदार, प्रा. डॉ. दीपक कांबळे, अधीक्षक अनोष गायकवाड, शशांक कवडगे आदी उपस्थित होते. काळा ओढा परिसरातील नागरी वस्तीत विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण केले. या माध्यमातून होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी काळा ओढा संवर्धनासाठी व्यंकटेश महाविद्यालय आराखडा तयार करणार आहे.सर्व महाविद्यालयांनी पंचगंगा वाचवण्यासाठी उपक्रम राबवण्याचा वज्रनिर्धार केला आहे. श्री व्यंकटेश महाविद्यालयाने काळा ओढा परिसर स्वच्छ करण्याचा निर्धार केला. विद्यार्थ्यांनी 'चला पंचगंगा वाचवूया' ही जनजागृती फेरी काढली. प्राचार्य डॉ. विजय माने यांच्या हस्ते प्रारंभ झाला. राजवाडा मार्गे ओढा परिसरातील सर्व नागरी वस्तीत फेरी निघाली. काळा ओढा स्वच्छतेचे आवाहन करत 'चला, पंचगंगा वाचवूया' असा संदेश जनजागृती फेरीतून देण्यात आला. त्यानंतर काळ्या ओढ्याचा श्वास मोकळा झाला.




श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे जागतिक महिला दिन साजरा गर्ल्स फोरम आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि.८ मार्च २०२२ रोजी श्री व्यंकटेश महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला डॉ. एस. एच. आंबवडे गर्ल्स फोरम प्रमुख यांनी प्रास्ताविक केले. जागतिक महिला दिनाचे महत्व, महिलांना घरी आणि कामाच्या ठिकाणी भेडसावणारे प्रश्न आणि या वर्षीची जागतिक महिला दिनाची मुख्य संकल्पना स्त्री–पुरूष समानता या विषयावर प्रास्ताविकात मार्गदर्शन केले. प्रा. मोहिनी आचलिया मॅडम यांनी कविता वाचन केले आणि 'महिला सक्षमीकरण ही काळाची गरज आहे, त्यासाठी सर्व प्रकारच्या महिलांनी एकत्र येवून काम केले पाहिजे, असे सांगितले पाहीजे. कु. पुष्पा बळीराम पाटील या विद्यार्थीनीने 'स्त्री कालची, आजची आणि उद्याची' या विषयावर अतिशय परखड विचार मांडले, कु. साक्षी स्वामी या विद्यार्थीनीने वंदेमातरम् या गीतावर संगीत योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. कु. प्रियंका कांबळे या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर स्वरचित कविता सादर केली. क अंजली लाटे या विद्यार्थीनीने लता मंगेशकर यांनी गायलेली गीते सादर केली. कु संस्कृती पाटील आणि कु. देवयानी कुर्ले या विद्यार्थीनींनी महिला दिन विशेष यावर नृत्य सादर केले. तसेच, महिला प्राध्यापिका सपना कदम यानी कविता सादर केली. मा. प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने अध्यक्षिय भाषणात ८ मार्च, जागतिक महिला दिन साजरा करण्यामागील उद्देश, स्त्री– पुरूष समानता, स्त्रीयांचा समाज घडविण्यामागील असणारा महत्वाचा सहभाग या विषयावर मागदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी कु पुष्पा बळीराम पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु सना मुल्ला या विद्यार्थीनीने केले. कार्यक्रमास प्रा.ए.आय. बाणदार (राष्ट्रीय सेवा योजना), डॉ. एस.एन. जरंडीकर (नॅक कोऑर्डीनेटर), प्रा. एस. आर. ठाकर, प्रा.एस.टी. बिरंजे आणि विद्यार्थीनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्राचार्य डॉ व्ही. ए. माने यांचे बहमोल सहकार्य लाभले.



जाहिरातविश्वाकडे करिअर म्हणून पाहा डॉ. विजय माने; व्यंकटेश महाविद्यालयात क्रिएटिव्ह अॅडव्हर्टाइजमेंट कॉम्पिटेशन ‘‘ कॉमर्स विभागाच्या विद्यार्थ्यांनी सर्वांगिण विकासासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील संधीकडे आपले करिअर म्हणून पाहिले पाहिजे. आपल्या अंगी असलेल्या सृजनशीलतेचा वापर करण्यासाठी समाजामध्ये अनेक क्षेत्र उपलब्ध असून जाहिरात विश्व हे त्यापैकी एक आहे. वेगळ्या क्षेत्रातील करियर हा दृष्टिकोन समोर ठेवून विद्यार्थ्यांनी जाहिरात विश्वाकडे पाहावे.‘‘ असे प्रतिपादन व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ते महाविद्यालयामध्ये आयोजित क्रिएटिव्ह एडवर्टाइजमेंट कॉम्पिटिशन या कार्यक्रमात बोलत होते. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. के मदनलालजी बोहरा शेटजी व कै. गिताबाई मदनलालजी बोहरा यांच्या स्मरणार्थ कॉमर्स असोसिएशनचे प्रमुख प्रोफेसर डॉ. एन. एम. मुजावर यांच्या कल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक सादर करताना ते म्हणाले, ‘‘ पारंपारिक शिक्षणाबरोबर मुलांना कृती करायला सांगून त्यामधून त्यांना ज्ञान आत्मसात करता आले पाहिजे. हा हेतू डोळ्यासमोर ठेवून या कल्पनेचा उदय झाला त्यामधूनच ही स्पर्धा घेण्यात येत आहे. विद्यार्थी जेव्हा स्वतः जाहिराती बनवतो तेव्हा त्याच्यातील सर्व बाबींचे ज्ञान त्यास अवगत होते.‘‘ या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील १९ संघांनी सहभाग घेतला. त्यांनी लेहंगा, माय ब्रँड शुज, एनर्जी ड्रिंक, मुक्ता साखर, पाटील नर्सरी, हरबल इम्युनिटी बूस्टर, अरोमा क्वीन परफ्युम, हॉटल चव आपुलकीची. इम्युनिटी प्लस, बीबीए फेश वॉश, विमला ड्रिंक, गोलमाल बिस्किट, क्लास, चॉकलेट, मायलो एनर्जी बिस्किट, विंग्ज शर्ट अशा विविध उत्पादनावर दृक्श्राव्य पद्धतीने जाहिराती बनवल्या होत्या. महत्वाचे म्हणजे या जाहिरातीचे शूटिंग, एडिटिंग, डबिंग व मॉडेल हे सर्व स्वतः विद्यार्थ्यांनी केले. यासाठी महाविद्यालयातर्फे २५०० १५००, १००० व सर्टिफिकेट असे प्राईज ठेवण्यात आले होते. यामध्ये बी. कॉम. प्रथम वर्षाच्या कु. साक्षी सुनील बावडेकर व संघ यांच्या लेहंगा जाहिरातीस प्रथम क्रमांक, बी. कॉम. तृतीय वर्षातील कु. तोहिद शमशुद्दिन माणगावे व संघ यांच्या स्काय एनर्जी ड्रिंक' या जाहिरातीस द्वितीय क्रमांक कु. स्वरुपा संजय मोहिते व संघ यांचा आरोमा क्वीन' या परफ्यूम जाहिरातीस तृतीय क्रमांक मिळाला. बी.बी.ए. विभागाच्या कु. अनघा रवींद्र रावळ व संघ यांच्या फॅशन हाऊस या जाहिरातीत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. याप्रसंगी सर्व संघांनी जाहिराती बनवताना आलेल्या अडचणी व अनुभव कथन केले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने, श्री. टी. एच. नायकवडी, श्री. टी. एन. मुल्ला, श्री. एस. बी. मलघाण, डॉ. पी. आर. गायकवाड, सौ. एस. टी. बिरंजे व अधिक्षक श्री अनोष गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. मोहिनी आंचलिया हिने केले. कार्यक्रमाचे आभार श्री टी. एच. नाईकवाडी यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*****************



***********

२३. श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये 'शिवराज्याभिषेक दिन'उत्साहात साजरा‘‘छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापना करून रयतेवर होणारा अन्याय दूर केला. जनतेसमोर प्रशासनाचा एक आदर्शच घालून दिला. आजही छत्रपती महाराजांचे कार्य प्रेरणा देत आहे. म्हणूनच महाविद्यालयीन स्तरावर युवकांना आपल्या जीवनामध्ये त्यांचा आदर्श घेऊन, आपले जीवन आदर्शवत करता यावे यासाठी महाविद्यालयाने विविध व्याख्याने व कार्यक्रमाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव केला पाहिजे.‘‘ असे मत प्राचार्य डॉ.व्ही.ए. माने यांनी मांडले. शिवराज्याभिषेक कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार, ग्रंथपाल श्री. एम.पी. केसरकर, ऑफीस अधिक्षक श्री. ए. एस. गायकवाड, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिवाजी



२५सकाळशुक्रवार, २५ मार्च, २०२राष्ट्रीय सेवा योजना प्रेरणादायी डॉ. माने; टाकवडेत व्यंकटेश महाविद्यालयाचे शिबिरइचलकरंजी, ता. २४ : देशाच्या भावी पिढीमध्ये समाजसेवेचे बोज रुजवण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना मोलाचे कार्य करीत आहे. त्यामुळे सामाजिक दृष्टिकोन वाढू लागला आहे. येत्या काळात राष्ट्रीय सेवा योजना भावी पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.टाकवडे (ता. शिरोळ) येथे व्यंकटेश महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिविरास सुरूवात झाली. याचे उद्धाटन सरपंच पी. वाय. पाटील, उपप्राचार्य प्रो.डॉ. एन. एम. मुजावर, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल कांबळे, माजी उपसरपंच तानाजी झुटाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. सात दिवस चालणाऱ्या श्रमसंस्कार शिबिरात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. अमिन बाणदार यांनी दिली. उपसरपंच सौ. धनश्री निर्मळ,ग्रामविकास अधिकारी श्रीमती एस. एल. शेळके, मुख्याध्यापक